नि. फौ. ख. क्र.१६४/२०२१ निशाणी ४०

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.६ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – डॉ. सैय्यद इशरत परवीन

वय – ३० वर्षे, वैद्यकीय अधिकारी, जिल्हा स्त्री रुग्णालय, अकोला

पत्ता – रा. हाजी नगर, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्री.के.एस.ताकवाले यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दिनांक २६/०२/२०२१ रोजी मी वैद्यकीय अधिकारी म्हणून ग्रामीण रुग्णालय, बाळापूर येथे कार्यरत होती. त्यादिवशी बाळापूर पोलिस स्टेशनचे हे.कॉ. देवानंद ब.क्र.७४० हे जखमी शेषराव जानकीराम धोटे यांना तपासणीकामी माझ्याकडे घेवून आले होते. मला आता सदरचा जखमी फॉर्म दाखविण्यात आला. त्यावर स्विकृत केल्याची माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्रं. ४१** देण्यात येते. मी शेषराव जानकीराम धोटे यांना तपासले. त्यांना खालीलप्रमाणे जखमा झाल्या होत्या.

a) Contusion on right thigh 15 x 10 cm,

b) Contusion on left thigh 20 x 10 cm,

c) Contusion on right side of back 20 x 15 cm,

d) Contusion on lower back 10 x 5 cm

२. हिस्टरी ऑफ असॅाल्ट दि.२४.०२.२०२१ रोजी संध्या. ६.३० वा. ची होती. त्यांना झालेली जखम टनक आणि बोथड (hard and blunt) वस्तुने झालेली होती. ती झालेली जखम साधारण अठ्ठेचाळीस तासा दरम्यानची होती. तसेच सदर जखम बरी होण्याचा कालावधी सात ते दहा दिवसाचा होता. मी सदर जखमीची तपासणी करून वैद्यकीय प्रमाणपत्र दिले. मला आता वैद्यकीय प्रमाणपत्र दाखविण्यात आले. ते तेच आहे. त्यावर माझी सही आहे. तसेच हे.कॉ. देवानंद यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ४२** देण्यात येते. मला आता वस्तु **निशाणी अ**

लाकडी काठी दाखविण्यात आली. जखमी शेषराव यांना झालेल्या वरील जखमा सदर काठीने होउ शकतात.

सरतपास पूर्ण. .

**<u>उलटतपास आरोपीतर्फे ॲड. श्री. एस. टी. इंगळे यांच्यामार्फत सुरू</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही जखम काही तासापासून ते तीन दिवसापर्यंत रंग बदलते. हे म्हणणे खरे आहे की, मी वैद्यकीय प्रमाणपत्रावर त्याबद्दल शेरा नमुद केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यावरुनच जखमेचा कालावधीचे अनुमान लावता येते. वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये नमुद जखमा व्यक्ती खाली पडल्यावर होवू शकतात. पोलीसांनी गुन्ह्यात वापरलेली काठी माझ्याकडे आणली होती किंवा कसे मला आठवत नाही. गुन्ह्यात वापरलेली वस्तू आमच्याकडे आणल्यास आम्ही त्याची तपासणी करुन स्वतंत्र अहवाल देत असतो. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी काठी माझ्याकडे आणली असती तर मी त्याची तपासणी करुन त्यावर अभिप्रायाचा अहवाल दिला असता. जखमी व्यक्तीला एखादा रोग असल्यास त्याला वैद्यकीय प्रमाणपत्रात नमुद जखमा होवू शकतात.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी दि.२६.०२.२०२१ रोजी जखमी शेषराव जानकीराम धोटे यांना तपासले नाही आणि पो.कॉ. देवानंद यांच्या सांगण्यावरुन प्रमाणपत्र दिले. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू निशाणी अ लाकडी काठीने वैद्यकीय प्रमाणपत्रात नमुद जखमा होवू शकतात, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2025.05.31 13:47:44 +0530

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर.

बाळापूर.
दि. २३.०५.२०२५